स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास
विद्यावाचस्पती (पीएच.डी) भूगोल पदवीसाठी सादर केलेली रूपरेषा

<u>प्रबंधाचा विषय</u>

“ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास”

<u>संशोधक</u>

मानकरे ज्ञानेश्वर रघुनाथ
भूगोल विभाग प्रमुख
एस.एन.डी.टी. कला, आणि एस.सी.बी.वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,चर्चगेट-२०

<u>मार्गदर्शक</u>

प्रा.डॉ.के.बी कणकुंरे
प्राचार्य व भूगोल विभाग प्रमुख
पदव्युत्तर अध्ययन व संशोधनविभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

शैक्षणिक वर्ष: २०१५-२०१६

"ठाणे-पालघर जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास"

प्रस्तावना:

आदिवासी हा शब्द Aboriginal या इंग्रजी शब्दावरून आला आहे. "आदिवासी" म्हणजे नागरी संस्कृतीपासून अलिप्त असलेल्या; पण आपल्या स्वत:च्या अशा पारंपारिक वैशिट्यांनी निसर्गाच्या सहवासात फार पूर्वीपासून राहत आलेल्या आणि स्वतंत्र जीवन जगणारा लोकसमूह म्हणजे आदिवासी होय (व्यवहारे २००२). आदिवासी म्हणजे मूळ निवासी, विशिष्ट भौगोलिक प्रदेशात प्राचीन काळापासून राहणारे लोक (त्या-त्या प्रदेशातील मूळ निवासी) म्हणजे आदिवासी होय. (गारे, २००१)

इ.स. १९६२ साली शिलॉग मध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासी ची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पुर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव करणाऱ्या, तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अशिक्षित असलेल्या व रक्तसंबधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला 'आदिवासी' समाज म्हणतात.

महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवसी जमाती आहेत व त्यातील २५ आदिवासी जमातींची लोकसंख्या जास्त आहे. महाराष्ट्रात आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचे वितरण असमान आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीची लोकसंख्या ज्या प्रदेशात अधिक आहे त्या प्रदेशाचे भौगोलिक दृष्ट्या तीन विभाग पडतात.

१) सहयाद्री विभाग : या विभागात ठाणे ,रायगड,नाशिक,अहमदनगर, पुणे इ. आदिवासी बहुल जिल्हयांचा समावेश होतो . या विभागात महादेव कोळी , वारली, कोकणा,ठाकर,कातकरी,मल्हार कोळी, इ. जमाती आढळतात.
२) सातपुडा विभाग : या विभागात नंदुरबार, जळगाव, अमरावती या जिल्हयांचा समावेश होतो. या विभागात भिल्ल , कोकणा,गावित, दुबळा,कोरकू,धानका,ताड्वी, पावरा या जमाती राहतात.
३) गोंडवाना विभाग : या विभागात विदर्भातील डोंगराळ व जंगलमय प्रदेशात विशेषतः चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली,यवतमाळ,हिंगोली,नागपूर,वर्धा,हे जिल्हे येतात. या जिल्हयात गोंड,माडिया गोंड,कोरकू,कोलम,परधान,आंध इ.आदिवासी जमाती वास्तव्य करतात.

महाराष्ट्रातील ठाणे जिल्हयात प्रामुख्याने महादे व कोळी ,ठाकर,कातकरी,वारली,कोकणा व मल्हार कोळी या जमातींचे लोक वास्तव्य करतात.

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचे सामाजिक जीवन , आर्थिक जीवन , सांस्कृतिक वैशिष्ट्ये, रूढी,परंपरा यांच्यात विविधता आढळते . प्रत्येक जमातींची वेगळी वैशिष्ट्ये आढळतात. प्रत्येक जमातींचे सामाजिक जीवन हे त्यां च्या सभोतालच्या भौगोलिक , आर्थिक आणि परंपरागत चालत आलेल्या व रूढ झालेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहे. असे असले तरी सर्वसामान्य 'आदिवासींचे' जीवन त्यांची मुल्य आणि वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो . शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे . शेती बरोबरच पशुपालन व दूग्ध व्यवसाय करतात . तसेच लहान- मोठे जंगलावर आधारित व्यवसाय जसे फुले , फळे, मध, डिंक विकणे, बांबू पासून विविध वस्तू बनविणे,शेतमजुरी, नोकरी यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असतो.

महाष्ट्रातील ठाणे - पालघर जिल्ह्यातील विविध आदिवासींची लोकसंख्या , लोकसंख्या वाढ, जन्मदर, मृत्युदर, आदिवासी लोकसंख्येचे वितरण,आदिवासी लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक अभ्यासणे त सेच आदिवासी लोकसंख्येच्या स्थलांतराचा तसेच स्थलान्तारांच्या कारणाचा अभ्यास प्र स्तुत प्रबंधात केला जाणार आहे . यासोबतच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या रचनेचा अभ्यास करणे यात आदिवासी लोकसंख्येची वयोरचना, लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण अभ्यासणे, आदिवासी लोकसंख्येची व्यावसाईक रचना अभ्यासणे तसेच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या समस्या अभ्यासून त्यावर योग्य त्या उपाय योजना सुचविणे या बाबींचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे.

अभ्यास क्षेत्राची निवड :

प्रस्तुत संशोधन ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी जमातींच्या लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास करण्यात येणार आहे . अभ्यास क्षेत्र म्हणून विभाजनपूर्व ठाणे जिल्हा घेतला आहे . विभाजनानंतर ठाणे व पालघर जिल्हे अस्थित्वात आले . हे दोन्ही जिल्हे आदिवासी बहुल लोकसंख्येचे आहेत. मुंबई व ठाणे हि मोठी महानगरे या परिसरात असताना देखील ठाणे - पालघर जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे . त्यामुळेच या महानगरांचा आदिवासी लोकसंख्ये च्या रचनेवर, वाढ व वितरणावर काय परिणाम झाला आहे का हे अभ्यासण्यासाठी ठाणे-पालघर जिल्हे अभ्यास क्षेत्र म्हणून निवडले आहेत.

विभाजन पूर्व ठाणे जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिमेला कोकण विभागातील सर्वात मो ठा जिल्हा होता. या जिल्हाचा अक्षवृतीय विस्तार १८° ४२' उत्तर ते २०° २०' उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७२° ४५' पूर्व ते ७३° ४८' पूर्व असा होता. या जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ९५५८ चौ.कि.मी. होते. जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी १४० कि.मी. व पूर्व-पश्चिम लांबी १०१

कि.मी.होती. या जिल्हात १५ तालुके होते पण १ ऑगस्ट २०१४ रोजी या जिल्हयाचे विभाजन करून नवीन पालघर जिल्हयाची निर्मिती करण्यात आली आहे . आता या जिल्हयात ७ तालुके आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे -पालघर जिल्हयाची लोकसंख्या १,१०,६०,१४८ एवढी असून महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.८४ % लोकसंख्या असलेला हा स र्वात मोठा जिल्हा आहे . या जिल्हयाची लोकसंख्येची घनता ११०६ इतकी होती . आदिवासींच्या लोकसंख्येचा विचार केला तर २०११ च्या जनगणनेनुसार एकूण आदिवासींची लोकसंख्या १५४२४५१ जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी १३.९५% आदिवासी जमातींची होती.



१ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्याचे विभाजन करून पालघर हा नवीन जिल्हा करण्यात आला.

ठाणे जिल्हयाचे अक्षवृत्तीय स्थान १८° ४२’ उ. ते २०° २०’ उ. व रेखावृत्तीय स्थान ७२° ४५’ पू. ते ७३° ४८’ पू. असून एकूण क्षेत्रफळ ४२१४ चौ.कि.मी. असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ८०,७०,०३२ आहे. तर लोकसंख्या घनता १९०० इतकी आहे.

पालघर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५३४४ चौ.कि.मी. आहे. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३०,१४,४३४ असून लोकसंख्येची घनता ५६४ एवढी आहे.

ध्येय आणि उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश ठाणे- पालघर जिल्ह्यातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास करून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठीच्या उपाय योजना सुचविणे आहे त्यासाठी खालील उद्दिष्टे ठेवली आहेत.

१) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी जमातींच्या लोकसंख्येची वाढ व वितरण यांचा अभ्यास करणे.
२) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येची रचना अभ्यासणे.
३) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येची सामाजिक व आर्थिक स्थितीचा चीकीस्तक अभ्यास करणे.
४) आदिवासी जमातीच्या लोकसंख्येच्या स्थलांतराचा कल अभ्यासणे.
५) आदिवासी जमातीच्या लोकसंख्येच्या समस्याचा अभ्यास करून त्या सोडवण्यासाठी उपाय सुचविणे.

गृहीतके :

ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासीं लोसंख्येचा भौगोलिक अभ्यास करताना वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खालील गृहीतके मांडली आहेत.

१) ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येची वाढ नियमित झालेली आहे.
२) आदिवासी लोकसंख्येची वाढ, वितरण व रचना यात प्रादेशिक भिन्नता आढळते .
३) आदिवासीच्या मागासलेपणाचे कारण शिक्षणाचा अभाव व शासनाची अनास्था आहे.

अभ्यास पद्धती व माहितीचे स्त्रौत :

प्रस्तुत संशोधनासाठी प्रा थमिक व द्वितीयक स्वरुपाच्या माहितीचे स्रौत वापरण्यात येनार आहेत. द्वितीयक माहितीच्या स्रौतामध्ये ठाणे जिल्ह्याचे सांख्यिकीय हस्तपुस्तिका , जिल्हा जनगणना अहवाल , जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन , आदिवासी विकास विभागाचे अहवाल , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे अहवाल ,भारतीय जनगणना विभागाचे अहवाल यांचा संशोधनासाठी उपयोग केला जाईल . तसेच प्राथमिक माहितीच्या स्रौतामध्ये प्रश्नावली व प्रत्य क्ष निरीक्षण पद्धतीचा उपयोग करू न माहिती संकलित केली

जाईल. याद्वारे आदिवासींची लोकसंख्या रचना, आदिवासीचे आरोग्य,शिक्षण, व्यवसाय,उत्पन्न हि माहिती संकलित केली जाईल.

माहिती व आकडेवारी संकलित केल्यानंतर त्याचे सांख्यिकीय पृथक्करण आणि वर्गीकरण करण्यासाठी तक्ते , आकृत्या, आलेख व नकाशे आवश्यक तेथे काढण्यात येतील . सांख्यिकीय विश्लेषण व नकाशाशास्त्रीय तंत्राचा वापरातून निष्कर्ष काढून शेवटी आदिवासी लोकसंखेच्या समस्या व त्यावरील उपाय सुचवले जातील.

अभ्यास विषयाचे महत्त्व :

प्रस्तुत संशोधन ठाणे- पालघर जिल्ह्यातील आदिवासींच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय सुचवण्यासाठी करण्यात येणार आहे . भारतातील इतर लोकसंख्येच्या मानाने आदिवासी समाज आजही मागासलेला आहे .त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षनाच्या, आरोग्याच्या व इतर नागरी सुविधा पुरविल्या गेल्या पाहिजेत . आदिवासींच्या विकासासाठी शासनाने वेळोवेळी विविध योजना अंमलात आणल्या आहेत पण तरीही त्याचा म्हणावा तसा परिणाम दिसून येत नाही.

प्रस्तुत संशोधनामध्ये ठाणे- पालघर जिल्यातील आदिवासी लोकसंख्या, लोकसंख्येची वाढ, वितरण, त्यावर परिणाम करणारे घटक ,घनता, जन्मदर, मृत्युदर, लिंग गुणोत्तर या लोकसंख्याशास्त्रीय घटकाचा अभ्यास केल्यामुळे या संदर्भात निर्माण होणारे प्रश्न सोडवण्यास मदत होईल. तसेच आदिवासीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास केल्यामुळे येथील आदिवासी जमातीचे सामाजिक व आर्थिक समस्या सोडवण्यासाठी सहाय्य होईल.

रूपरेषा :

१) **प्रकरण पहिले-प्रस्तावना :** यामध्ये अभ्यास क्षेत्र , अभ्यास पद्धती, गृहीतके, ध्येय व उदिष्ट्ये, अभ्यास विषयाचे महत्त्व , संदर्भ साहित्याचा आढावा इ . घटकाची माहिती दिली जाईल.

२) **प्रकरण दुसरे-भौगोलिक माहिती :** या प्रकरणामध्ये ठाणे-पालघर जिल्ह्याची भौगोलिक माहिती असेल. यात भौगोलिक स्थान, भूपृष्ठ रचना, हवामान, भूगर्भ रचना, मृदा, नैसर्गिक वनस्पती, प्राणी, वाहतूक व दळणवळण , महत्त्वाच्या वस्त्या याची माहिती असेल.

३) **प्रकरण तिसरे - ऐतिहासिक पार्श्वभूमी :** या प्रकरणात ठाणे-पालघर जिल्ह्यांचा प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहास असेल.

४) **प्रकरण चौथे - लोकसंख्येची वाढ व वितरण** : या प्रकरणात ठाणे जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकसंख्या वाढ व तिचे वितरण तसेच आदिवासी लोकसंख्येची वाढ व वितरण तसेच एकूण लोकसंख्या वाढ व वितरण आणि आदिवासी लोकसंख्येची वाढ व वितरण याची तुलना असेल.

५) **प्रकरण पाचवे- लोकसंख्याशास्रीय वैशिष्ट्ये** : या प्रकरणात ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास असेल. यात लिंग गुणोत्तर, वयोरचना, व्यवसाईक रचना, जन्मदर, मृत्युदर, अवलंबित्व या वैशिष्ट्यांचा अभ्यास असेल.

६) **प्रकरण सहावे- सामाजिक वैशिष्ट्ये** : या प्रकरणात ठाणे जिल्ह्यातील आदिवासी जमाती, आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण, आरोग्य, धार्मिक चालीरीती, विवाहाच्या पद्धती याचा आढावा असेल.

७) **प्रकरण सातवे - आर्थिक वैशिष्ट्ये** : या प्रकरणात ठाणे जिल्ह्यातील आदिवासींची आर्थिक स्थिती, व्यवसाय, उत्पन्न व खर्चाचे प्रारूप इ.चा आढावा असेल.

८) **प्रकरण आठवे - सारांश व निष्कर्ष** : या प्रकरणात माहितीचे पृथक्करण करून काढलेले निष्कर्ष व सर्व संशोधन कार्याचा सारांश याचा समावेश असेल.

संदर्भ साहित्याचा आढावा :

लोकसंख्येचा अभ्यास भूगोलतज्ञ प्रादेशिक व पर्यावरणीय दृष्टीकोनातून करतात . समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ यांचा कार्यावर देखील भूगोल तज्ञांचा प्रभाव दिसून येतो . उदा. इंथोवेन (१९२२), हैमेंडोर्फ (१९४३), एल्विन व्ररीर (१९४५), रसेल आणि हिरालाल (१९७५), शरद कुलकर्णी (१९८२), के.एस.सिंग (१९८२). यासोबतच भारतीय भूगोलतज्ञांनी आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महत्वपूर्ण संशोधन केले आहे. जसे हुसेन (१९७७), बोस (१९६२),दीक्षित (१९८६), दक्षा बराई (१९७५), सत्येश चक्रवर्ती (२००१), बुद्धदेव चक्रवर्ती (१९८२), गोविंद गारे (१९७९), के. सीता (१९८१), फडके (१९८२),के.सी.रामोत्रा (२००९), या भूगोलतज्ञांनी भारतीय आदिवासिंची लोकसंख्या आणि आदिवासी जमातींचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. भारतातील वेगवेगळ्या आदिवासी जमातींचे प्रादेशिक वितरण स्पष्ट केले आहे.

बोस (१९७१) यांनी भारतातील आदिवासी जमातीच्या सर्वसामान्य वितरणाचा आढावा घेतला आहे. तर दक्षा बराई यांनी अंदमान- निकोबार मधील आदिवासी जमातींचे संशोधन केले आहे. **आपटे (१९७६)** यांनी रायगड जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा नमुना निवड पद्धतीने १५ आदिवासी गावांचा अभ्यास केला . त्यांनी आदिवासी जमातीची साधन संपदा , जीवन उपयोगी साधने, व्यवसाय रचना याचा अभ्यास केला.

गोपाल राव (१९७८) श्रीकाकुलम जिल्हयातील पंराठीपूरम तालुक्यातील नामु नानिवड पद्धतीने कांही गावातील आदिवासी जातींचा व इतर ग्रामीण लोकसंख्येचा अभ्यास केला. त्यात त्यांना आढळले की आदिवासी लोकांकडे शेती नसल्यामुळे त्यांना शेतमजूर म्हणून काम करावे लागते आणि ज्यांच्याकडे शेत जमीन आहे त्यांना समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

के.सिता आणि फडके (१९८१) यांनी पश्चिम भारतातील सहयाद्रीच्या प्रदेशातील आदिवासी जमातीच्या समस्यांचा सूक्ष्म स्थरावर अभ्यास केला आहे . **दिक्षित (१९८६)** यांनी महाराष्ट्रातील आदिवासींचा अधिवास, वितरण, त्यांचा व्यवसाय, आदिवासींचे जीवन यासंदर्भात अभ्यास केला आहे.

सुभाष सिंग व महाबिलेश राज (१९८९) यांनी आदिवासीं कल्यान नियोजना संदर्भात अभ्यास केला आहे. त्यांच्या मते इतर लोकांच्या मानाने आदिवासीची आर्थिक स्थिती दयनीय आहे. आदिवासींचे दरडोई उत्पन्न, शेतीची उत्पादकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, शेतीचा आकार या सर्व बाबतीत आदिवासी लोक इतर समाजाच्या मानाने मागे आहेत . कांही भागात बेरोजगारीची समस्या खूपच गं भीर आहे. आदिवासींचे अनेक घटकांकडून शोषण होत असते ; आदिवासींचा अशिक्षितपना, बुजरेपणा, त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष , शासनाची उदासीनता ही त्याची करणे आहेत.

गाडगीळ आणि बेरके (१९९६) यांच्या संशोधनातून स्पष्ट झाले की आदिवासी लोक नैसर्गिक साधन संपदाच्या संवर्ध नासाठी सजग असतात . त्यासाठी ते आपल्या परंपरागत ज्ञानाचा उपयोग करतात.

गारे गोविंद (१९८२) : यांनी आपल्या 'आदिवासींचे प्रश्न' या ग्रंथात आदिवासींच्या समस्या व उपाय योजनाचा अभ्यास केला आहे .जंगलाशिवाय आदिवासी सुखी- समाधानी राहू शकत नाही. जंगलावर आधरित त्यांचे जीवन आहे .जंगलातून त्यांना अन्न आणि निवारा मिळतो. विविध प्रकारची फळे,फुले,कंदमुळे,मध,शिकार यावर मोकळेपणाने व स्वतंत्रपणे जगात आले आहेत.परंतु जंगलविषयक कायदे अमलात आल्यानंतर मात्र आदिवासींच्या या मोकळ्या व स्वतंत्रवृत्तीवर अनेक बंधने आली. त्यामुळे त्यांची सामाजिक, मानसिक व आर्थिक दृष्ट्या हेळसांड झाली आहे.

संगवे विलास (१९७२) : यांनी आपल्या 'आदिवासींचे सामजिक जीवन ' या ग्रंथात आदिवासींचा सामाजिक अभ्यास केला आहे . आदिवासी समाज आपल्या भूभागासी अतिशय निगडीत झालेला असतो . त्या भागात असलेल्या नैसर्गिक साधनसामुग्रीचा आपल्याजीवन निर्वाहासाठी जास्तीत जास्त उपयोग करून घेतात . तसेच या भूभागावर समाजातील लोक वर्षानुवर्ष वस्ती करून राहतात . तत्या विशिष्ट प्रदेशात दीर्घकाळ व्यतीत केल्यामुळे या

समाजातील लोकांना आपल्या प्रदेशाबद्दल आत्मीयता वाटत असते . त्यांचे परस्परांशी जवळचे संबंध प्रस्थापित होतात . या संबधातूनच आदिवासी समाजातील लोकांमध्ये एकीची भावना निर्माण होते. त्यांना स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव होऊ लागते आणि आपण इतर समाजातील लोकांपासून भिन्न असल्याची भावना द्रुढ होऊ लागते .परंतु त्यांची पारंपारिक घरे , त्यांची रचना, वस्ती, दैनंदिन वापरातील वस्तू त्यांचा पोशाख या सगळ्यातूनच त्यांच्या संस्कृतीचे वेगळेपण त्यांचे निसर्गाशी असणारे नाते दिसून येते.

मनघुटे प्रमोद (२००७) : यांनी आपल्या 'आदिवासी साहित्य स्वरूप व समस्या ' या ग्रंथात आदिवासींची वर्तमान स्थिती सांगितली आहे . त्यांच्या मते आदिवासींचे संपूर्ण जीवन वनावर अवलंबून असते तसेच त्यांची जीवनशैली वनाशी सुसंगत असते . परंतु जेव्हा जंगल कायदा अंमलात आला तेव्हापासून जंगलातील लाकूड ,फळे, मध, बांबू, तेंदूची पाने तोडण्यावर बंदी आली. तसेच शिकार करण्यावर बंदी आली तेव्हापासून त्यांच्या जीवनशैलीत खंड पडला त्यामुळे आदिवासिंच्या हलापेष्टाना सुरुवात झाली.

उपाध्याय (२०००) यांच्या संशोधनानुसार स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने व राज्य सरकारांनी आदिवासींच्या प्रगतीसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या आहेत . बदलत्या काळानुसार त्यात बदलही केले आहेत त्यामुळे आदिवासींच्या जीवनात सुधारणा घडून येत आहेत.

मुखर्जी (२०१२) यांच्या मते नैसर्गिक पर्यावरण आपल्या परिसरातील लोकांना अनेक पदार्थ, सेवा, साधने उपलब्ध करून देत असतो. नैसर्गिक साधनसामुग्रीचा आपण अती उपयोग करून घेतल्यामुळे आदिवासींचे जीवन धोक्यात आले कारण त्यांचे संपूर्ण जीवनच निसर्गावर अवलंबून आहे.

संदर्भ सूची :

१) अहिरराव व अलीझाड (२००१) : " लोकसंख्या भूगोल ", निराळी प्रकाशन, पुणे.
२) आगलावे प्रदीप (२०००) : "संशोधन पद्धती व तंत्र", विद्या प्रकाशन, नागपूर.
३) गारे गोविंद (१९८२) : "आदिवासींचे प्रश्न", आदिम प्रकाशन, पुणे.
४) गारे गोविंद (१९८५) : "आदिवासींचे शिक्षण आणि जागृती ", ट्रायबल रिसर्च बुलेटीन vol. vii p.no.29-39
५) गारे गोविंद (२०००) : " महाष्ट्रातील आदिवासी जमाती", कौंटीनेन्टल प्रकाशन,पुणे.
६) गारे गोविंद (२००२) : "सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील (ठाकर) आदिवासी", श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
७) कुलकर्णी शौनक (२००९) : "महाराष्ट्रातील आदिवासी", डायमंड प्रकाशन, पुणे.

८) नाडगोंडे गुरुनाथ (१९७९) : " भारतातील आदिवासी", कौंटीनेन्टल प्रकाशन, पुणे.
९) मनघुटे प्रमोद (२००७) : "आदिवासी मराठी साहित्य स्वरूप व समस्या", पुणे.
१०) संगवे विलास (१९७२) : " आदिवासींचे सामाजिक जीवन", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

संशोधक

मानकरे ज्ञानेश्वर रघुनाथ

भूगोल विभाग प्रमुख
एस.एन.डी.टी. कला, आणि एस.सी.बी.
वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,
चर्चगेट मुंबई-२०

मार्गदर्शक

प्रा.डॉ.के.बी कणकुरे

प्राचार्य व भूगोल विभाग प्रमुख
पदव्युत्तर अध्ययन व संशोधनविभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर